सन २०१६-१७ च्या राज्य शिक्षक पुरस्कार सत्कार समारंभाच्या खर्चास वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः पीटीसी-२०१७/प्र.क्र.७४/टीएनटी-४

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १३ सप्टेंबर, २०१७

वाचा :-

१) शासन परिपत्रक क्रमांकः क्र.पीटीसी-२०१५/प्र.क्र.(१२/१५)/टीएनटी-४,दि.१९/१/२०१५ व शुध्दीपत्र दि.२०/०१/२०१५

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीटीसी २०१६/प्र.क्र.४७/ दि.१४.६.२०१६.

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीटीसी २०१६/प्र.क्र.९५/ दि.२१.७.२०१६.

४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचे पत्र क्र.शिसं /राशिपु /समारंभ /२०१७ /विद्याशाखा/२७४१, दि. २०/०७/२०१७ चे पत्र.

५) शासन निर्णय समक्रमांक, दिनांक ३/०८/२०१७.

प्रस्तावना :-

महिला व मुलींच्या शिक्षणासाठी विशेष उल्लेखनीय कार्य केलेल्या शिक्षिकांना थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले आदर्श स्त्री शिक्षिका पुरस्कार तसेच राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणा-या शिक्षकांना "राज्य शिक्षक पुरस्कार" जाहिर करण्यात आले आहेत. शालेय शिक्षण विभागामार्फत राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना पुरस्कार वितरण करुन त्यांचा सत्कार करण्यासाठी शासन स्तरावर दरवर्षी दिनांक ५ सप्टेंबर या शिक्षक दिनी खास समारंभ आयोजित करण्यात येतो. या वर्षीचा दि. १८ सप्टेंबर, २०१७ रोजी होणारा पुरस्कार वितरण व सत्कार समारंभ सोलापूर येथे आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे. या समारंभासाठी लागणा-या अंदाजित खर्चाचा प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २०/०७/२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केला. सदर पुरस्कार समारंभासाठी होणाऱ्या खर्चास उपरोक्त संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि सदरहू कार्यक्रमावरील खर्च भागविण्यासाठी रक्कम संक्षिप्त देयकावर एकरकमी काढण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना राज्य पुरस्कार, सावित्रिबाई फुले पुरस्कार व आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ठ काम करणा-या शिक्षकांना राज्य पुरस्कार या योजनेअंतर्गत सन २०१७-१८ करिता खालील लेखाशिर्षापुढे नमुद केलेल्या तरतूदीप्रमाणे रु.१८१.५० लक्ष (रुएक कोटी एक्क्याऐंशी लाख . पन्नास हजार फक्त) एवढा निधी शासन मंजूर करीत आहे.

रूपये लाखात

अ.क्र.	लेखाशिर्ष	मंजूर निधी
१	२	३
१	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण ,८०० इतर खर्च(०२) संकिर्ण (०२) (०१) आदर्श शिक्षकांना पुरस्कार (दत्तमत) (२२०२ २२९२)	१७३.००
२	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, (०२) संकीर्ण (०२) (४६) अदिवासी क्षेत्रातील उकृष्ट कामासाठी शिक्षकांना राज्य पुरस्कार (२२०२ ३६८२)	४.५०
३	२२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च (०२) संकीर्ण (०२) (०३) आदर्श स्त्री शिक्षिका पुरस्कार (२२०२ २८८२),	४.००
	एकूण :-	१८१.५०

२. महाराष्ट्र आकस्मिक खर्च अधिनियम १९६५ च्या परिशिष्ट-१ विवरण पत्र-२ मधील अनुक्रमांक ५४ नुसार पारितोषिक वितरण समारंभासाठी संबंधित असलेले अनुषंगिक खर्च संक्षिप्त देयकावर काढणे अनुज्ञेय असुन वित्त विभागाच्या दि.२६/२/२००४ च्या शासन निर्णयानुसार विभाग प्रमुखांना रुपये ५०,०००/- पर्यंतच्या रकमा संक्षिप्त देयकांवर काढण्यांचे अधिकार आहेत. परंतु या प्रकरणी सदर रक्कम त्यापेक्षा जास्त असल्यामुळे वित्त विभागाच्या अनुमतीनुसार राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभावरील खर्च भागविण्यासाठी एकूण रुपये १८१.५० लक्ष (रु. एक कोटी एक्क्याऐंशी लाख पन्नास हजार फक्त) रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यांत येत आहे.:-

१) शासन परिपत्रक क्र.माविनि-१०१६/प्र.क्र.६/१६/विनियम, दिनांक ४ मार्च,२०१६ मधील सुचनेनुसार (२२०२ २२९२, २२०२ ३६८२, २२०२ २८८२) या लेखाशिर्षाखाली दिनांक ३१.३.२०१७ यापुर्वीचे तपशिलवार देयक प्रलंबित नाही.

२) दिनांक ३१.३.२०१७ नंतर संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशिलवार देयाकांचा तत्परतेने निपटारा करण्यात येईल.

३) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

४) खर्च नियमित देयकाव्दारे करणे शक्य नसुन त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

५) या संक्षिप्त देयकाचे तपशीलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची व्यक्तिगत जबाबदारी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

६) मासिक निधी विवरण पत्रानुसार याकरीता निधी उपलब्ध आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८६८/व्यय ५ दि.१.९.२०१७ व अनैपचारिक संदर्भ क्र. ४१३/विनियम दि. १.९.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७०९१३१५५८४१६४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b952353 7dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2017.09.13 15:49:31 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य,पुणे

२) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

३) शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे

४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२ मुंबई /नागपूर

५) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

६) सहायक शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय,पुणे.

७) विभागीय शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग, पुणे.

८) कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

९) वित्त विभाग, व्यय - ५ / विनियम

१०) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक

११) प्रधान सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहाय्यक

१२) निवडनस्ती-टिएनटी-४.